imma™

Maharashtra Times

Karvy Group

Date: 27/09/2011 | Edition: Mumbai | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 24 H: 17

Clip: 1 of 1

# जब घर में पड़ा हो सोना...

गौरी देशपांडे-केळकर



**किमान कागदपत्रे, झटपट प्रक्रिया, कमी कटकटी, परतफेड सोपी, तुलनेने कमी व्याजदर यामुळे कमी वेळात व कमी रकमेचे कर्ज उभारायचे असेल तर सोन्यावर कर्ज घेण्याचा पर्याय अनेकांना सोयीचा वाटतो. या कर्जाचे स्वरूप कसे असते, ते कुठून घेता येते याविषयीचा हा आढावा.**

'२००८ सालच्या आर्थिक संकटापासून सोन्यावरील कर्जाला असलेले महत्त्व वाढले आहे. येत्या तीन ते चार वर्षांत गोल्ड लोनमध्ये ३५ ते ४० टक्के 'सीएजीआर' (कम्पाऊंडेड ॲन्युअल ग्रोथ रेट) वाढ होण्याचा अंदाज आहे', असे कार्वी फायनान्शिअल सर्व्हिसेस लि.चे सीईओ अमित सक्सेना यांनी सांगितले. भारताचे सोन्याचे रिटेल कन्झमशन दरवर्षी ३२ टक्क्यांनी वाढते. सोन्याच्या किमती भडकल्या वा घटल्या तरी सोन्याच्या रिटेल मागणीवर परिणाम झालेला नसल्याने गोल्ड लोन क्षेत्रही यापुढे झळाळतच राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले. २०१० आर्थिक वर्षात गोल्ड लोनची उलाढाल ३५ ते ४० हजार कोटी रुपयांची होती, अशी आकडेवारी मुथूत फायनान्स लि.चे एमडी जॉर्ज ॲलेक्झांडर मुथूत यांनी दिली.

**सोन्यावर कोठून व कसे कर्ज घ्यावे?**

सोने केवळ लॉकरमध्ये पडून राहण्यापेक्षा आर्थिक आणिबाणीच्या वेळी ते गहाण ठेवून लहान व झटपट कर्ज मिळवण्यासाठी गोल्ड लोनचा पर्याय अवलंबला जातो. बँका आणि 'एनबीएफसी'कडून (नॉन-बँकिंग फायनान्शिअल कंपनी) सोन्यावर कर्ज घेता येते. हे कर्ज घेण्याची प्रक्रिया तशी सोपी आहे. कर्जाचा कालावधी, मूल्यांकन, फिक्स्ड कॉस्ट यानुसार कर्जाच्या विविध योजना असतात. सोन्याचे दर सतत बदलत असल्याने या योजनाही वेळोवेळी बदलत असतात. 'गोल्ड लोन ऑफिसर'शी चर्चा करून ग्राहक त्यांना सोयीची वाटणारी योजना निवडतात. त्यानंतर त्यांच्याकडील सोन्याचे मूल्यांकन केले जाते. त्यासाठी इन-हाऊस व्हॅल्युअर असतात. सोन्याची शुद्धता, कॅरेट व वजन यानुसार त्याचे मूल्य ठरवले जाते व मूल्यांकनानुसार कर्जाची रक्कम ठरवली जाते. शुद्ध सोन्याची नाणी, बार यापेक्षा कर्ज शक्यतो दागिन्यांवर देण्याकडे कल अधिक असतो. सोन्याच्या मूल्याच्या अंदाजे ७८ टक्क्यांपर्यंत कर्ज दिले जाते, अशी माहिती अमित सक्सेना यांनी दिली, तर कर्जाचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत असू शकते, असे फ्युचर कॅपिटल होल्डिंग्ज लि.चे व्हाइस प्रेसिडेंट - सेल्स (एलजी व एलएएस) अरिंदम दास यांचे म्हणणे आहे.

सोन्याच्या मूल्यांकनांच्या पद्धतीत प्रत्येक कर्जदात्यानुसार थोडेफार बदलत होतात. १८ ते २४ या कॅरेटमधल्या सोन्यावर कर्ज दिले जाते. 'हॉलमार्क' असलेल्या सर्व दागिन्यांवर वजन, शुद्धता व बाजारपेठेतील सध्याची किंमत यानुसार कर्ज दिले जाते. हॉलमार्क चिन्ह नसलेल्या दागिन्यांचाही कर्जासाठी विचार केला जातो. काही चाचण्या करून त्यांची शुद्धता तपासली जाते. सोन्याच्या दागिन्यांमध्ये मौल्यवान खडे घडवले असल्यास त्या खड्यांचे मूल्य व वजन विचारात न घेता कॅरेटनुसार मोजले जाते, अशी माहिती अरिंदम दास यांनी दिली.

## पर्सनल फायनान्स

या कर्जासाठी फारच कमी कागदपत्रे लागतात. सर्वप्रथम कर्जासाठी अर्ज भरून द्यायचा असतो. त्यामध्ये सर्व नियम व अटी नमूद केलेल्या असतात. त्यानंतर 'केवायसी'नुसार (नो युवर कस्टमर) ग्राहकांची माहिती घेतली जाते. त्यांना रिसिट दिली जाते. त्यामध्ये कर्जाची रक्कम, सोन्याच्या वस्तू, त्यांचे वजन आदी माहिती असते. कर्जाची रक्कमही त्याच वेळी दिली जाते. ही सर्व प्रक्रिया बँकांत काही तासांत, तर 'एनबीएफसी'मध्ये १५ ते २० मिनिटांत होते, अशी माहिती अमित सक्सेना यांनी दिली.

**व्याजदर किती असतो?**

कोणत्या योजनेअंतर्गत कर्ज घेतले आहे, यावर कर्जाचे व्याज ठरते. पण ते ११ ते २४ टक्के या दरम्यान असते. प्रत्येक कर्जदात्यानुसार व्याजदर बदलतो. कर्जाची मुदत सर्वसाधारणतः ३० ते ९० दिवस अशी असते, असे अमित सक्सेना यांनी सांगितले. तर, मुथूत यांनी दिलेल्या माहितीनुसार कर्जाचा सरासरी कालावधी ७५ ते ९० दिवस असतो. सोन्यावर कर्ज एक ते दोन वर्षांसाठीही घेतले जाते. काही वेळा तर तीन वर्षांसाठी कर्ज मिळू शकते. या कर्जाचे 'ईएमआय' ठरलेले नसतात. त्यावरील व्याज नियमित भरायचे असते, मुद्दल शक्य तेव्हा परत केली तरी चालते.

**सुरक्षित कर्ज**

सोने तारण ठेवून दिले जाणारे कर्ज तसे सुरक्षित मानले जाते. कर्जदाराला परतफेड करणे अशक्य झाल्यास कर्जदाता सोने विकून त्याची रक्कम परत मिळवू शकतो. परंतु, सोन्याला असलेले पारंपरिक महत्त्व वा भावनिक गुंतागुंत लक्षात घेता तारण ठेवलेले दागिने सोडवून आणण्याकडे ग्राहकांचा कल असतो. त्यामुळे या प्रकारच्या कर्जामध्ये 'एनपीए'चे प्रमाण अगदी कमी असते. सोन्यावर घेतलेल्या कर्जाच्या काळात सोन्याचे मूल्य घसरल्यास त्यातील फरकाची रक्कम कर्जदाते मागू शकतात, असे मुथूत यांनी सांगितले.

तज्ज्ञ सल्ला देतात की, सोन्यावर लहान रकमेचे कर्ज घ्यावे आणि ते परत करून आपले दागिने सोडवून आणण्यासाठी रोखतेची खात्री करून घ्यावी. कर्ज परत न केल्यास ते परत करण्याच्या अंतिम मुदतीपासून १२ महिन्यांनी त्याचा लिलाव केला जातो, असेही मुथूत यांनी नमूद केले.